# घरकुल

दोन अंकी स्वतंत्र नाटक

**लेखक : प्रल्हाद जाधव**

***

पात्रे :

शांताबाई - (७५)

राजा - (३०)

सोनाली - (२५)

यशवंत - (१६)

शांता - (१२)

अंक पहिला / प्रवेश पहिला

(पडदा उघडतो. हळूहळू उजेड. सकाळ. रंगविहारींचं घर दिसतं. छोटे अंगण. अंगणाला छोटी चिंचोळी पडवी. वर ओटा. दोही बाजूला दोन पडव्या, त्या अर्ध्या विंगेत. ओट्यावरून आत जाण्यासाठी मधोमध दरवाजा. दरवाजाच्या चौकटीवर कवी रंगविहारी यांचा जुन्या धाटणीचा एक फोटो. कोट- पागोटे घातलेला, रंग उडालेला, अस्पष्ट, पटकन ओळखू येणार नाही असा. दर्शनी भिंतीच्या उघड्या फडताळात एक जुना रेडिओ.

अंगणातून एक पायरी चढून पडवीत आणि पडवीतून एक पायरी चढून ओट्यावर जावे लागते. तेथून उंबरठा ओलांडून माजघरात जाता येते. दर्शनी भिंतीच्या खिडकीतून माजघरात टांगलेला लामणदिवा दिसतो. मागे परसदार. तेथील प्रकाशाचा चौकोन कधी कधी पुढच्या अंगणातून दिसतो. पडवीचे पुढे आलेले कौलार. जुन्या पद्धतीची नळ्यांची फुटकी कौले. त्यातून गवत उगवलेले. भिंती ढासळलेल्या. पडवीत बसायला उठायला एक छोटे लाकडी बाकडे. अंगणाच्या एका बाजूला आड. आडाचा रहाट दिसतो. तो फिरवून पाणी काढता येतं. आडाच्या काठाला टेकून उभं राहता येतं, बसता येतं. आडाला लागूनच उजवीकडे कुंपण. कुंपणातून जाळीदार प्रकाश आत येतो. कुंपणाच्या पलीकडून रस्ता गेलेला आहे. अंगणाच्या डाव्या बाजूने घरात येण्याची वाट. 'मधु मागशी माझ्या सख्या परी...' हे भा. रा. तांब्यांचं गाणं रेडिओवर सुरू आहे. शांताबाईंचा पुतण्या राजा त्याना भेटण्यासाठी पुण्याहून आला आहे. तो बाहेरूनच 'काकू ऽऽ ए ऽ काकू' अशा हाका मारत येतो)

राजा : (येतो. खांद्याला जुजबी सामानाची झोळी. हातात वर्तमापत्राची घडी) काकू ऽऽऽ ए काकू ऽऽऽ (पडवीत चढून आत डोकावत आणखी मोठ्याने हाका मारतो. मधला दरवाजा उघडून शांताबाई बाहेर येतात. रेडिओ बंद करतात आणि किलकिल्या डोळ्यानी पाहतात. तो पुन्हा 'काकू SS' अशी हाक मारतो. )

शांताबाई : कोण ?

राजा : मी राजा. ओळखलं नाहीस का ? राजन !

शांताबाई : हो, हो... आत्ता आलं लक्षात ये... ये... दुसरं कोण आहे इथं मला काकू म्हणणारं ?

राजा : इतक्या वर्षांनी आठवायचं म्हणजे तसं कठीणच...

शांताबाई : तसं नाही रे, अजून स्मरणशक्ती शाबूत आहे माझी... पण कुणीना कुणी रोज येतं त्रास द्यायला हल्ली. वाटलं त्यातलंच कुणी आलं की काय... (राजन पायाना स्पर्श करत नमस्कार करतो. त्याला जवळ घेत) औक्षवंत हो. केवढा मोठा झालास रे !

राजा : मोठा होणार नाही तर काय, काळ कुणासाठी थांबतो का ?

शांताबाई : हो, तेही खरंच म्हणा...

राजा : (झोळी खुंटील अडकवत ) शेवटचे आपण कधी भेटलो होतो, आठवतंय ?

शांताबाई : लग्न करून पाया पडायला आला होतास तेवढाच.

राजा : बरोबर ! सात वर्ष झाली... (विराम)

शांताबाई : मला वाटलंच होतं तू येणार म्हणून...

राजा : न येऊन करतो काय? रंगविहारींचं जमशताब्दी वर्ष साजरं करण्यात सरकार इतका रस घेत असेल तर घरातल्या माणसांनी घ्यायला नको?

शांताबाई : खरं बोललास अगदी !

राजा : गाडीतनं उतरलो, रेस्ट हाऊसवर बॅग ठेवली आणि सरळ इकडेच आलो.

शांताबाई : तिकडं का राहायला गेलास ? आपलं घर नव्हतं का ?

राजा : अगं, आता कार्यक्रमाच्या निमित्तानं रात्र-रात्र जागावं लागणार. लोक येणार. चर्चा होणार. म्हटलं तुला त्रास कशाला त्याचा ?

शांताबाई : (खुंटीवर टांगलेला पंचा काढ्रा रहाटाकडे जाता जाता ) तू नाही आलास म्हणून त्रास व्हायचा थांबणार आहे का ? रोज कुणीना कुणी असतंच. त्यात हल्ली ही सांधेदुखी ! प्रतिभा बरी आहे ना ?

राजा : हो, अगदी मजेत.

शांताबाई : आणि मुलगा– काय नाव त्याचं ?

राजा : विद्यानंद.

शांताबाई : हो, विद्यानंद, कसा आहे तो ?

राजा : एकदम फर्स्टक्लास. तिसरीत गेलाय यंदा. कॉन्व्हेंटमध्ये शिकतोय. तुझ्याकडे चाललोय असं सांगितलं तर मागं लागला होता.

शांताबाई : मग आणायचा की रे...

राजा : तुला माहिताय काकू आजकाल जगणं किती धकाधकीचं झालंय ते. पुण्यात आणि मुंबईत काहीही फरक राहिलेला नाही. त्यातून तिची नोकरी. बघू पुढं कधीतरी... (रहाटाजवळच्या बादलीतून तांब्याचा तांब्या बाहेर काढतात. पंचा आणि तांब्या त्याच्याकडे देतात. तो पंचा खांद्यावर टाकतो आणि हातपाय धुवू लागतो.) घेऊन ये कधीतरी त्यांना... आपली माणसं भेटली की तेवढंच बरं वाटतं. आधार वाटतो.

राजा : मघाशी काय म्हणत होतीस ?

शांताबाई : कसलं ?

राजा : कोणी त्रास द्यायला येतं म्हणून...

शांताबाई : अरे कोण ते वेगवेगळ्या पत्रांचे बातमीदार ! सोबत फोटोग्राफरही घेऊन येतात. जन्मशताब्दी साजरी होतेय कवीची म्हणून काय तोंडाला येईल ते विचारतात. कचाकचा फोटो काढतात. त्यांना सांगितलं की फोटो काढले की आयुष्य कमी होतं माणसाचं. तरी ऐकतच नाहीत...

राजा : (तोंडावर पाणी मारत) आठ दहा वर्षात केवढा बदल झालाय धुळ्यात ! मोठमोठे रस्ते, इमारती, गाड्या, हॉटेलं, दुकानं... मला आधी वाटलं की चुका आपण भलत्याच गावी उतरलो की काय! लहानपणीची एकही खूण राहिली नाही कुठं ...

शांताबाई : काळाचा महिमा. मघाशी म्हणालास ना;  काळ थांबतोय कुणासाठी !

राजा :  तुझं कसं चाललंय ? काय करतेस सध्या ?

शांताबाई : आता आणखी काय करणार ह्या वयात ? तू पाठवतोस तेवढ्या पैशांवर भागतं. डोळ्यांनी दिसत नाही, ऐकायलासुद्धा नीट येत नाही हल्ली...

राजा : माझी मनीऑर्डर मिळते ना दरमहा ! पैसे पुरतात ना ? गरज पडली तर मागून घेत जा आणखी. रंगविहारींच्या चारित्राची पंधरावी आवृत्ती संपलेय आता. चांगलं मानधन मिळतंय. त्यावर नैतिकदृष्ट्या तुझाच हक्क आहे असं मानतो मी.

शांताबाई : (तो विषय टाळत) काय काय ठरलंय कार्यक्रमाचं ?

राजा : अगं, रंगविहारी मूळचे धुळ्याचे म्हणून इथंच त्यांच्या जन्मशताब्दी वर्षाचा शुभारंभ करायचं ठरलंय. मग वर्षभर सगळीकडं कार्यक्रमांचा धुमधडाका उडणार आहे. संमेलनं, चर्चा, परिसंवाद, मेळावे, काव्यगायन, रंगविहारींच्या नावाचे पुरस्कार समारंभ... काही विचारू नको. उद्घाटक म्हणून मुख्यमंत्री, प्रमुख पाहुणे म्हणून ज्ञानपीठ पारितोषिक विजेते भाऊसाहेब पटवर्धन (थांबून) आणि प्रमुख वक्ता म्हणून कोण येणार असेल, ओळख बरं ?

शांताबाई : दुसरं कोण असणार? यशवंत वामन किर्लोस्कर ऊर्फ रंगविहारी यांचा पुतण्या आणि त्यांच्या साहित्याचा गाढा अभ्यासक डॉक्टर राजन किर्लोस्कर !

राजा :  (खूश होत) हे मात्र बरोबर ओळखलस हं तू. तुला कसं काय माहीत ?

शांताबाई : सोनालीनं सांगितलं मला.

राजा : सोनाली ?

शांताबाई : सोनाली हेरवाडकर...

राजा : सोनाली हेरवाडकर... नाव ऐकल्यासारखं वाटतंय. मुंबईच्या कुठल्याशा पेपरात बातमीदार आहे. (आठवत) काय ते, हां... 'लोकसत्ता' !

शांताबाई : बरोबर, ओळखतोस तू ?

राजा : ती भवानी कुठं भेटली तुला ?

शांताबाई : अरे, रंगविहारीचं जमशताब्दी वर्ष सुरू होतंय ना म्हणून सारख्या फेऱ्या सुरू असतात तिच्या इकडं. कवीविषयी काहीना काही बातम्या देणं कायम सुरू आहे तिचं संपादकांनी जबाबदारी टाकलीय म्हणत होती. सहा महिन्यात पाच-सहा वेळा येऊन गेली. आली की इथंच उतरते. तिनंच सांगितलं मला प्रमुख पाहुणा म्हणून तू येणार असल्याचं.

राजा : खरं म्हणजे वेळ नव्हताच पण आमदार ढाकणे आणि नगराध्यक्ष कोल्हे दोघंही मागं लागले. आधी मी नाही म्हणालो पण दोघांचीही पत्रावर पत्रं. मानधनाचा चेकसुद्धा आधीच पाठवून दिला. मग नाही कसं म्हणायचं ? म्हणाले, ‘एवढे मोठमोठे साहित्यिक येणार आपल्या गावात तर तुमचेही पाय लागू द्या जरा.’

शांताबाई :  तू आहेसच तेवढा मोठा...

राजा : मुद्दाम दोन दिवस आधी आलो. म्हटलं तुझी तब्बेतपण तपासून घेऊ. चांगल्या डॉक्टरकडं जाऊ. तुझी तयारी असेल तर पुण्याला चल माझ्याबरोबर... तिथली औषधं घेऊ !

शांताबाई : तुला खरं सांगू का, जोवर औषधं घेत नव्हते ना, तोवर अगदी ठणठणीत होती माझी प्रकृती. पण औषधं घ्यायला सुरुवात केली आणि बिघडायला लागली बघ. (खुदुखुदु हसतात.)

राजा : बोलण्यात हात धरणार नाही कोणी तुझा!

शांताबाई : कॉलेज कसं काय चाललंय ?

राजा : चांगलं बस्तान बसलंय, पोरं खूष आहेत आपल्यावर ! एक तास बुडवत नाहीत. आता रिडरशिप मिळवायची आणि विद्यापीठात जायचं...

शांताबाई : नवीन काय लिहितोयस ?

राजा : काकांच्या कवितेवर पीएच. डी. करताना काही गोष्टी राहून गेल्या होत्या.... त्यातलाच एक विषय घेतलाय शोध निबंधासाठी. पुढच्या महिन्यात जागतिक मराठी परिषद भरतेय...

शांताबाई : अमेरिकेत !

राजा : शाब्बास ! तुला कसं माहीत ?

शांताबाई : सोनाली !

राजा : जरा सांभाळूनच राहा बरं का तिच्यापासनं. गेल्या सहा महिन्यापासून काय वाटेल ते छापतेय ती रंगविहारींविषयी. मला संशय होताच की ती इथं येऊन तुला भेटली असणार म्हणून.

शांताबाई : ... कोणत्या विषयावर लिहितोयस 'शोध निबंध' ?

राजा : 'घरकुल' या कवितेवर लिहितोय... जागतिक मराठी परिषदेत प्रसिद्ध करायचंय ते पुस्तक.

शांताबाई : एका कवितेवर शोधनिबंध ?

राजा : अख्खी पीएच. डी. करता येईल त्या कवितेवर. काकांच्या कवितेवर एवढं लिहून आलं पण त्या कवितेला म्हणावा तसा न्याय मिळाला नाही अजून ! त्यातली कोणतीही ओळ वाचावी आणि धन्य व्हावं.

(ओळी म्हणून दाखवत)

सुखदुःखाची ऊन सावली घ्यावी अंगावरती

मुक्या घराचा अर्थ सांगण्या माजघरातील माती

शांताबाई : छान!

राजा : पण या कामात मला तुझ्या मदतीची गरज आहे. 'घरकुल' विषयी काही नवे संदर्भ मिळाले तर शोधायचे आहेत. त्या काळातील आणखी काही संदर्भांची शहानिशा करून घ्यायची आहे. काकांच्या खाजगी आयुष्याविषयीसुद्धा अधिक खोलात जाऊन माहिती मिळवायची आहे.

शांताबाई : कसलं आलंय डोंबलाचं खाजगी आयुष्य! जो येतो तो हाच मुद्दा काढतो. त्या सोनालीनंसुद्धा असंच भंडावून सोडलंय. काय एकेक विचारते, आजुबाजूच्या गावांत फिरून काय येते... लोकांच्या मुलाखती काय घेते... फोटो काय काढते... काही विचारू नको. ( सोनाली येते. तरुण. सुंदर. आधुनिक, मोकळ्या विचारांची... हातात एक बॅग. खांद्याला शबनम. ) हॅलो शांताबाई, हाऊ आर यू ?

शांताबाई : ये. शंभर वर्ष आयुष्य आहे तुला. तुझ्या विषयीच बोलणं चाललं होतं...

सोनाली : 'थिंक ऑफ ए डेवील ॲण्ड डेवील इज देअर (मोठ्याने हसते )

शांताबाई : म्हणजे काय ग ?

सोनाली : सैतानाची आठवण केली की सैतान हजर. (ती बॅग ओटीवर ठेऊन आडाजवळ जाऊन पाय धुवू लागते. मग तोंडावर पाणी मारते, बॅगेतला टॉवेल काढून तोंड पुसू लागते)

शांताबाई : (खुदुखुदु हसत) आहेसच तू मुळी सैतान... तुला ओळख करून देते. हा माझा पुतण्या–

सोनाली : (स्वतःच) डॉक्टर राजन किर्लोस्कर, एम. ए. पीएच. डी. रंगविहारींचा एकुलता एक विद्वान पुतण्या. उभा महाराष्ट्र ओळखतो यांना ! नमस्कार !

राजा : नमस्कार !

सोनाली : माझं नाव–

राजा : सोनाली हेरवाडकर ! वाचतो नेहमी पेपरात. 'लोकसत्ता'ची रविवार पुरवणी काढतेस ना तू ?

सोनाली : अजून पूर्णपणे ते काम माझ्याकडं आलं नाही, पण वाटचाल सुरू आहे त्या दिशेनं, माझं स्वप्नच आहे ते म्हणा ना !

राजा : 'बेस्ट ऑफ लक्' !

सोनाली : थँक्यू.

राजा : त्यात काय एवढं!

सोनाली : तुमचं काय चाललंय हल्ली नवीन ?

राजा : तसं काही खास नाही. एक शोधनिबंध लिहितोय... तेच सांगत होतो आता हिला...

सोनाली : कोणत्या विषयावर ?

राजा : रंगविहारींच्या 'घरकुल' या कवितेतील ...

शांताबाई : (आत निघत) हे बघा, तुम्ही बसा बोलत. मी जरा चहा करते. मला उगाच तुमच्या त्या चर्चेत अडकवू नका. आधीच पत्रकारांनी भंडावून सोडलंय. नको नको ते प्रश्न विचारतात. फोटो काढतात, असं वाटतं की पटकनी मरण यावं आता...

राजा : ( गमतीने) त्यासाठी एक सोपा उपाय सांगू ?

शांताबाई :  कोणता ?

राजा : दहा-बारा फोटोग्राफरना बोलावतो आणि तुझे भरपूर फोटो काढायला सांगतो. (खुदुखुदु हसत) फोटो काढण्याबद्दल तसं काही विशेष नाही रे. पण फोटो काढून ते बाहेर त्यांचा धंदा करतात, पैसे कमावतात...

राजा : (हातातली पेपरची घडी नाचवत) मग कमवूदे की बिचाऱ्याना. महाराष्ट्रातील एका थोर कवीची बायको आहेस तू. तुझे किंवा तुझ्या घराचे फोटो छापल्यामुळं जर कुणाचं पोट भरत असेल तर ते भाग्यच नाही का एक प्रकारे ?

शांताबाई : (आत जाण्याचा विचार बदलत) कसलं भाग्य घेऊन बसलास? फोटोखाली काहीतरी भलतीसलती माहिती छापतात, त्यामुळं नकोसं होतं अगदी. कधी - कधी तर अगदी हसावं का रडावं तेच कळत नाही.

राजा : असं काय म्हणतेस?

शांताबाई : (पेपरातला फोटो दाखवत) हे बघ... बघ नीट. बघितलास हा फोटो ?

राजा : बघितला.

शांताबाई : इथं पडवीच्या बाजूला लाकडं भरण्यासाठी एक खोपी केली होती, तिथलाय तो. गेल्या महिन्यातच कोणीतरी येऊन काढून गेलं.

सोनाली : (पुढे होऊन पेपर ओढून घेत... 'बघू बघू' म्हणत कॅप्शन मोठ्यानं वाचते.)' या ठिकाणी बसून रंगविहारींनी आपल्या ओक प्रसिद्ध कविता लिहिल्या' (मोठ्यानं हसते)

राजा : काय झालं हसायला ?

सोनाली : हसू नको तर काय करू ? रंगविहारींच्या नावावर काय वाट्टेल ते छापलं जातंय हल्ली... आणि म्हणून तर आमच्या संपादकांनी हा विषय सोपवलाय माझ्याकडं... सत्यशोधन करून वास्तव जगासमोर आणायचं !

राजा : वाट्टेल ते छापलं जातंय म्हणजे ?

सोनाली : तुमच्या पुण्याच्या एका पत्रानं काय जावईशोध लावलाय माहीत आहे का ?

राजा : कसला जावईशोध ?

सोनाली : म्हणे किर्लोस्कराना रंगविहारी ही पदवी साहित्यसम्राट नारायणशास्त्री पुणतांबेकर यांनी दिली.

राजा : मग काय चुकलं त्यात ? सगळ्या जगाला माहिताय ते. चरित्रात तेच लिहिलंय मी त्यांच्या.

सोनाली : तेच सांगतेय मी. खोलात जाण्याची, कष्ट करण्याची तयारीच नाही कुणाची.

राजा : काय ते स्पष्टपणे का बोलत नाहीस ? कसल्या खोलात जायचं ?

सोनाली :  'काव्यसरित्सागर 'कर्ते आनंदराव बर्वे हे रंगविहारींचे बालमित्र...

राजा : माहिताय, त्यांच्या आत्मचरित्राचा बराच उपयोग करून घेतलाय मी रंगविहारींचं चरित्र लिहिताना.

सोनाली : त्यानींच किर्लोस्कराना रंगविहारी ही पदवी दिली.

राजा: (तुच्छतेने) हॅऽऽऽ, १८९० साली इथं जे साहित्य संमेलन झालं त्यात पुणतांबेकरांनी प्रथमच काकांचा उल्लेख 'रंगविहारी' असा जाहीररित्या केला होता.

सोनाली : साहित्य सम्मेलनाच्या दिवशीच बर्व्यांच्या भावाचं लग्न होतं. त्याची लग्नपत्रिका अजून जपून ठेवलेय शांताबाईंनी.

राजा : त्या पत्रिकेचा इथं काय संबंध ?

सोनाली : त्या पत्रिकेवर मागच्या बाजूला एक सूचना होती.

राजा : कसली सूचना ?

सोनाली : (सूचना वाचून दाखवत असल्याप्रमाणे) 'सर्व साहित्यिकांची दुपारच्या भोजनाची व्यवस्था लगमंडपात केलेली आहे... तिथं जेवणापूर्वी किर्लोस्करानी 'रंगबहार' ही त्यांची कविता म्हणून दाखवली... ती ऐकून बर्वे उत्स्फूर्तपणे म्हणाले की, 'चला रंगविहारी, आता जेवायला बसा' तेव्हापासून किर्लोस्कर रंगविहारी झाले ते कायमचे !

राजा : मग पुणतांबेकरांचं नाव काय आभाळातनं पडलं का ?

सोनाली : तसा त्यांचा काही संबंध नव्हता. ते फक्त संमेलनाचे अध्यक्ष म्हणून आले होते. पण तेवढ्यावरून तुम्ही मंडळीनी वडाची साल पिंपळाला लावली.

राजा : तोंडात येईल ते बोलू नको... संशोधन हे एक शास्त्र आहे, कष्ट करावे लागतात त्यासाठी. बुवाबाजी नाही करता येत तिथं...

सोनाली : मला माहिताय ते चांगलं, वडलांचं अख्खं आयुष्य  संशोधनात गेलंय माझ्या...

राजा : म्हणजे त्या हेरवाडकरांची मुलगी तू ?

सोनाली : हो, पण इथं त्याचं काहीही क्रेडिट घ्यायचं नाही मला ! मी माझ्या मेरिटवर पुढं जाणारी बाई आहे... आता हेच बघा– रंगविहारींची जन्मशताब्दी कधीपासून सुरू करताय तुम्ही ?

राजा : म्हणजे काय ? परवा, २७ तारखेपासनं.

सोनाली : खरं तर ती गेल्या आठवड्यातच सुरू व्हायला हवी हाती.

राजा : शिळ्या कढीला पुन्हा ऊत काढण्याचा प्रकार आहे हा! तुमच्या पेपरात छापलंही होतं तुम्ही; पण लोकांनी लक्ष दिलं का ?

सोनाली : सर्वसामान्य माणसाला काय कळतंय त्यातलं ? त्यांची मूळ जन्मतारीख वीस जून अशी आहे.

राजा : उगाच काहीतरी थापा मारू नको तू. गोंदेवाडी ग्रामपंचायतीत जाऊन सगळं रेकॉर्ड स्वतःच्या डोळ्यानी बघून आलोय मी.

सोनाली : (जोरदारपणे) वीसमधील शून्याचा वरचा अर्धा भाग खरवडला गेल्यामुळ ते सातासारखं दिसतंय इतकंच.

राजा : पण ते शून्यच आहे याला आधार काय ?

सोनाली : ए.का.कशाळकर म्हणून रंगविहारीचे एक बालमित्र होते. त्यांच्या वडलांनी रंगविहारीची जन्मपत्रिका बनवली होती. कशाळकरांच्या बहिणीची नात वंदना अभ्यंकर इंदूरला हिंदीची प्राध्यापक आहे. तिला जाऊन भेटून आलेय मी. रंगविहारींच्या कवितांचा अभ्यास करतेय ती. तिनंच शोध लावलाय खऱ्या जन्मतारखेचा.

राजा : म्हणजे मी रंगविहारींचा साक्षात पुतण्या जे सांगतो ते खोटं. गोंदेवाडीच्या ग्रामपंचायतीतलं रेकॉर्ड खोटं... जन्मतारीख जशी अंकी लिहिली जाते तशीच अक्षरीही लिहिली जाते हे लक्षात ठेव.

सोनाली : वीसच्या मागं 'सत्ता' एवढं लिहिलं की सत्तावीस होऊ शकतं !

राजा : पण असं करायला काही कारण नको ?

सोनाली : तुमच्या म्हणण्याप्रमाणं कवीचा जन्म गोंदेवाडीला झाला. बरोबर ?

राजा : माझ्या म्हणण्याचा प्रभच कुठं येतो - जगानं माय केलंय ते.

सोनाली : पण कवीचा जेव्हा जन्म झाला तेव्हा गोंदेवाडी हे गावच अस्तित्वात नव्हतं.

राजा : शुद्धीवर आहेस का तू ?

सोनाली : विचारा शांताबाईंना.

राजा : काय म्हणतेय ही ? आणि तुझं तोंड बंद का ?

सोनाली : सांगा शांताबाई !  मी जरा आवरते माझं. (बॅगेतून सोनपापडीचा एक पुडा काढून शांताबाईंना देत) हे घ्या, तुमच्या आवडीचा खाऊ...

शांताबाई : काय आणलंस ग ?

सोनाली : सोनपापडी.

शांताबाई : ऐकूनच तोंडाला पाणी सुटलं... आम्ही लहान होतो तेव्हा जत्रेत 'बुढ्ढी के बाल' मिळायचे. अण्णा घेऊन द्यायचे आम्हाला. (खुदुखुदु हसतात)

(बॅग घेऊन आत जायला निघते.)

राजा : काय म्हणाली ही गोंदेवाडीबाबत ?

शांताबाई : (आठवत) मला साल नक्की आठवत नाही. पण फार पूर्वी कधीतरी एकदा बाणगंगेला महापूर आला होता. त्यात नदीच्या काठावरचं एक गाव पूर्णपणे उद्ध्वस्त झालं. गावात गोंदे आडनावाची पन्नास-साठ कुटुंबं होती.

ती सगळीच्या सगळी त्या पुरात वाहून गेली. कलेक्टरांनी त्या गावाचं पुनर्वसन करून गोंद्यांची स्मृती म्हणून त्या नव्या गावाला गोंदेवाडी हे नाव दिलं.

सोनाली : ( आत जात) म्हणजे गोंदेवाडीचा जन्म झाला तेव्हा रंगविहारींचं वय होतं पंधरा वर्षांचं.

राजा : मग रंगविहारींचा जन्म झाला तरी कोणत्या गावी ?

शांताबाई : त्याचा जन्म झाला वावडद्याला. तिथं प्लेगची साथ होती म्हणून वामनराव किर्लोस्करानी त्याला उनेरीला हलवलं आणि तिथनं पुढं शाळा शिकण्यासाठी गोंदेवाडीला आणलं.

राजा : वायफळ बडबड चाललेय तुझी नुसती.

शांताबाई : खरं बोललास बाप्पा ! वायफळ बडबड ! म्हणूाच मी गप्प बसणं पसंत करते नेहमी. आणि खरं सांगून तरी त्यामुळं काय फरक पडतोय म्हणा!

राजा : उगाच मानभावीपणा करू नकोस...

शांताबाई : कसला मानभावीपणा ? गेल्या आठवड्यात काही पत्रकार आले होते. त्यांना सांगितलं हे सगळं पण त्यांनी छापलं भलतंच...

राजा : काय छापलं ?

शांताबाई : (त्याच्या हातातल्या वृत्तपत्राकडे निर्देश करीत) शिवाय, हे असले फोटो... म्हणे इथं बसून रंगविहारींनी आपल्या अनेक प्रसिद्ध कविता लिहिल्या. (तोंडाला पदर लावून खुदुखुदु हसतात)

राजा : त्यात एवढं हसण्यासारखं काय आहे ?

शांताबाई : हसू नको तर काय करू ?

राजा : (किंचित तापत ) काय ते सांग ना मग... बोल !

शांताबाई : बोलून काय करायचं ? लोकांच्या गप्पांना आणि अफवांना नवे विषय आपणच मिळवून द्यायचे ?

राजा : मलासुद्धा सांगत नाहीस, मला लोक समजतेस का तू ?

शांताबाई : एवढी मोठी पीएच. डी. मिळवलीस, कधी एका शब्दानं विचारलंस ?

राजा : खरंय तुझं पण आधारभूत साहित्य खूप होतं हाताशी... त्यामुळं गरज वाटली नाही.

शांताबाई : आणि तुला सांगितलं असतं तर काय केलं असतंस तू ? तुझ्या काकाचं एवढं मोठं चरित्र लिहिलंस त्यात लिहिलं असतंस का ते ? आणि लोकांनी विश्वास तरी ठेवला असता का त्यावर ?

राजा : हे बघ काकू, सत्य हे लोकांच्या समोर येणं आवश्यक असतं, मग ते कितीही कटू असो...

शांताबाई : लोकांना फक्त आपल्या सोयीचं सत्य हवं असतं.

राजा : बरं असेल त्यांच्यात एखादी खोट. तरी पण एक थोर कवी म्हणून लोकांच्या मनात असणाऱ्या त्यांच्या प्रतिमेला काही धक्का लागणार आहे का ? त्यांच्या कवितेचं मोल कमी होणार आहे का ? त्यांच्या केवळ 'घरकुल' ह्या एका कवितेसाठी लोक शंभर गुहे माफ करतील त्यांना !

शांताबाई : 'घरकुल'वरनं बरी आठवण झाली. तू आता एवढा आलाच आहेस, तर माझ्या ह्या घरकुलाची जरा डागडुजी करून दे बाप्पा. सगळी पडझड झालीय. देवघरातल्या भिंतीला भगदाड पडलंय, त्यातां मांजरं आत येतात, तेवढं बुजवून दे. परसदारी गवताचं रान माजलंय तेही साफसूफ करून टाक. कौलांवरही नजर टाक जरा. पाऊस सुरू झाला की माजघरात गळायला लागतं. (बाहेर पाहत) येणारंच एवढ्यात असं दिसतंय. वादळ झालं रात्री मोठं...

राजा : वेळ मिळेल तसतसा येईन आणि करीन तुझी कामं. पण मी इतक्या लांबवरून आलोय तर आधी चहावगैरे तरी देशील की नाही ?

शांताबाई : देते रे बाबा देते, उठतच होते चहासाठी. पण तुम्ही उठू दिलंत का ? आणि हे बघ चहा घे, तुझी बैठक का काय ती आटप, तिथनं बाजारात जा. ..

राजा : आणि औषधं घेऊन ये, असंच ना ?

शांताबाई : बरोबर, या सांधेदुखीनं नकोसं करून टाकलंय अगदी! पण मुख्य म्हणजे येताना भरताची वांगी आणि ओल्या मिरच्या घेऊन ये.

राजा : (आनंदाने) वा वा क्या बात है ! नुसतं ऐकूनच तोंडाला पाणी सुटलं...

शांताबाई : वाटलंच होतं मला.

राजा : तुला खरं सांगू काकू ? मी व्याख्यानांच्या निमित्तानं अनेक ठिकाणी फिरलोय पण तुझ्या हातचं भरीत आणि भाकरी या पदार्थांना कुठंच तोड नाही. (आणखी कौतुक करीत) भाकरी करावी तर ती फक्त आमच्या काकूनं...

सोनाली : (कपडे बदलून बाहेर येत शांताबाईचं पुढील वाक्य स्वतःच बोलत असल्याप्रमाणे). "त्याचं सर्व श्रेय सासुबाईना. आभार मान, म्हणजे आत्मा शांत होईल त्यांचा."

राजा : म्हणजे ? (शांताबाईंना ) काय म्हणतेय ही ?

शांताबाई : (खुदुखुदु हसत) अरे, लगन होऊन पहिल्यांदा घरी आले तेव्हा सासूबाईंनी एवढी मोठी काटवट पुढे सरकवली. त्यात ही ऽऽऽ पिठाची रास ओतली आणि म्हणाली, 'कर भाकऱ्या '

राजा : मग ?

शांताबाई : काय मग ? मला कुठल्या तेव्हा भाकऱ्या करता येत होत्या ? मी इतकी लहान होते की माझ्या परकराची नाडीसुद्धा माझी आई बांधून द्यायची.

राजा : मग पुढं काय झालं ?

शांताबाई : घेतलं रामाचं नाव आणि मळलं पीठ. कशीबशी केली भाकरी आणि तव्यात टाकली तर तिचे चार तुकडे झालेले... तव्याच्या काठाचा मनगटाला ह्या इथं चांगला चरचरून डाग मिळाला. अजून खूण आहे ही बघ...

राजा : खरंच की ! (शांताबाईंचा हात हातात घेऊन ती खूण पाहतो) बापरे...

शांताबाई : भाकरी मोडलेली पाहून सासुबाईनी माहेरच्या सात पिढ्यांचा उद्धार केला आणि केसाला धरून फरपटत ह्या आडापाशी आणली.

राजा : आडापाशी ? आणि ती कशाला ?

शांताबाई : दुसरं कशाला ? आत ढकलायला ! भाकरी मोडली की घर मोडतं असं त्या म्हणायच्या. छोटे भाऊजी, म्हणजे तुझा बाप मध्ये आला म्हणून जगले तेव्हा.

राजा : आणि रंगविहारी कुठं होते तेव्हा ?

शांताबाई : तिथं वरती माळ्यावर बसून काहीतरी वाचत होता तो.

राजा : मग ते धावून आले नाहीत तुझ्या मदतीला ?

सोनाली : त्यांची काय हिंमत होती आईच्या विरोधात जायची ? आईच्या धाकात होते ते. ममाज् बॉय. (हसते)

राजा : इतक्या संवेदाशील मनाचा माणूस आपली बायको विनाकारण मार खातेय हे पाहून गप्प बसेल यावर कोणीही विश्वास ठेवणार नाही.

सोनाली : त्या कुठं म्हणतायत ते गप्प बसले म्हणून ?

राजा : मग ? काय केलं त्यांनी ?

सोनाली : दुसरं काय करणार ? कविता केली...

राजा : कविता ? भाजलेल्या हातावर ?

सोनाली : का? हा कवितेचा विषय होऊ शकत नाही? उलट अनेकजण शाळा कॉलेजातून ती उत्साहानं शिकवतात. नामवंत समीक्षक डोक्यावर घेऊन नाचतात.

शांताबाई : अगं, काहीतरीच काय चाललंय तुझं ?

सोनाली : तुम्ही कितीही नाही म्हटलंत शांताबाई, तरी आज ना उद्या समजणारच आहे ते लोकांना.

राजा : कोणती कविता म्हणतेयस तू ?

सोनाली : 'ज्वालांचं विलसित'

राजा : वेड्यात काढतील लोक अशानं तुला.

शांताबाई : श्रीराम ऽऽऽ

राजा : (शांताबाईंना) डोकं फिरलंय तुझंसुद्धा! शांताबाई : श्री राऽऽऽम

(त्याच्याकडं दुर्लक्ष करीत सोनाली उपरोधानं त्या कवितेच्या काही ओळी म्हणू लागते)

सोनाली :

ज्वालांची उमनी विलसिते

थरकते काजळी

जलनयनातील लखलखते

अहा रम्य मग भृंग मानसी करितो रसनापाते

विश्वची गाणे होते..

(राजा गोंधळलेला. संतप्त. शांताबाई अस्वस्थ. मनगटावरील त्या डागावर दुसरा हात हळुवारपणे फिरवत राहतात. जणू काही तो डाग म्हणजे त्यांच्या आयुष्यातील एक दुखरी जखमच होय. ढगांचा गडगडाट.  अंधार होऊ लागतो.)

***

अंक पहिला / प्रवेश दुसरा

(स्थळ : तेच. संध्याकाळ. मागच्या चौकटीतून तांबूस लालसर प्रकाश आत येत आहे. शांताबाई माजघरातला लामणदिवा लावतात, एक पणती घेऊन बाहेर येतात रंगविहारींच्या फोटोखाली असणाऱ्या देवळीत ठेवतात. पुहा आत जाऊन भाजीचं सूप घेऊन येतात आणि पडवीतल्या खांबाला टेकून भाजी निवडत बसतात. रेडिओवर 'चाफा बोलेना' हे 'बी' यांचे भावगीत सुरू आहे. राजा बाहेरून येतो. पायावर पाणी घेऊन आत जातो आणि पिण्याच्या पाण्याचं भांडं आणि औषध- गोळ्यांचा डबा घेऊन बाहेर येतो. रेडिओचे बटन बंद करून शांताबाईंच्या जवळ जाऊन बसतो.)

राजा : (गोळी काढून देत ) ही घे गोळी. (त्या घेतात. तो पाण्याचं भांडं पुढं करतो. पाण्याच्या घोटाबरोबर त्या गोळी गिळतात) आराम पडलाय ना थोडा ?

शांताबाई : कालपासून बरं वाटतंय जरा. पण औषधापेक्षा तू इथं आहेस त्याचाच परिणाम जास्त आहे. तू आलास आणि आपोआप तब्येत सुधारली माझी.

राजा : उगाच, क्रेडिट देऊ नको मला. काका गेल्यावर पन्नासच्यावर वर्षे एकटीनं काढलीस, कुठं अडलं का तुझं ? आणि त्यात आता 'ती' आहेच तुझ्या दिमतीला. शांताबाई : कोण ?

राजा : दुसरं कोण ? (बाटलीतील औषध चमच्यात ओतून ) हे घे. (त्या तोंड पुढं करून मिटक्या मारीत औषध घेतात. )

शांताबाई : तुझा उगाचच काहीतरी गैरसमज झालाय तिच्याविषयी. चांगली सुसंस्कृत मुलगी आहे ती...

राजा : कसली सुसंस्कृत ? तिच्या भानगडी माहीत नाहीत तुला.

शांताबाई : भानगडी ?

राजा : लग्न झाल्यावर सहा महिन्यातच नवऱ्यानं सोडून दिलंय तिला...

शांताबाई : का 'तिनंच सोडलंय' नवऱ्याला ?

राजा : चांगलंच पढवून ठेवलेलं दिसतंय तिनं तुला. पण नीट ऐक! बातम्यांच्या नावाखाली ही रात्रंदिवस घराच्या बाहेर राहणार... पार्ट्या अटेंड करणार... हिची मित्र-मंडळी रात्री-बेरात्री तिच्या घरी जाणार... ही आठाठ दिवस कुठंना कुठं गायब होणार, मग कोण नांदवणार तिला? आता सांस्कृतिक खात्याच्या मंत्र्याला धरलंय. विमानानं फिरते त्यांच्याबरोबर. त्याला मध्ये घालून 'टेन पर्सेंट' मधला फ्लॅट मिळवलाय मुख्यमंत्र्यांकडून...

शांताबाई : ( विषय बदलत) ... कुठवर आलं ?

राजा : कसलं ?

शांताबाई : कार्यक्रमाचं रे दुसरं कसलं?

राजा : विषय बदलतेयस तू.

शांताबाई : आपण कशाला कुणाच्या खाजगी भानगडीत नाक खुपसायचं ?

राजा : म्हणजे काहीतरी 'भानगड' असणार एवढं तरी माय करतेस तू !

शांताबाई : आपल्याला जसं उत्तर पाहिजे तसे प्रश्न विचारून मुद्दा तडीस नेणं पोरकटपणाचं असतं राजा.

राजा : तोंडात मिळाची गुळणी धरून बसण्यापेक्षा परवडलं ते !

शांताबाई : श्रीरामऽऽऽ

(दोघांनाही तो वाद वाढवायचा नाही विराम.)

राजा : कार्यक्रम संपला की लगेच निघणार आहे मी.

शांताबाई : काय ठरलंय नेमकं ?

राजा : आमदार ढाकणे आणि नगराध्यक्ष कोल्हे प्रथमच एकत्र आलेत या निमित्तानं. नाहीतर दोघांच्यातनं विस्तव जात नव्हता. मोतीबागेतल्या मैदानावर मंडप घालण्याचं काम सुरू झालंय. गांधीचौकात स्मारक उभारताहेत. स्मारकापासून नगरवाचनालयापर्यंत दिंडी निघायचीय.

शांताबाई : कसलं स्मारक करताहेत ?

राजा : स्मारकाची मूळ कल्पना आमदार ढाकण्यांची. ते म्हणाले की, “रंगविहारींची 'घरकुल' ही कविता मराठीतील सर्वश्रेष्ठ आणि एकमेवाद्वितीय कविता आहे ना, मग रंगविहारींचं स्मारक म्हणून हिरव्या संगमरवराचं एक छोटं घरकुलच उभारायचं आपण.”

शांताबाई : (सूक्ष्म उपरोधाने) वा छान!

राजा : घरकुलाच्या भिंतीवर त्या कवितेच्या ओळी कोरायच्या. मागंपुढं चांगली हिरवळ. फुलझाडं. नक्षीदार पितळी साखळ्यांचं कंपाऊंड... जन्मशताब्दीवर्षाचा शुभारंभ म्हणून भाऊसाहेब पटवर्धनांच्या हस्ते हे स्मारक महाराष्ट्राला

अर्पण करायचं... कल्पना कर, स्मारक म्हणून त्यांची संपूर्ण कविता संगमरवरात कोरलेली आहे. आणि आपण वाचतोय. (दोन ओळी म्हणतो)

रमलखुणांनी मंतरलेला एकच ऐसा क्षण यावा,

नदीच्या काठी बसून जैसा कृष्ण वाजवी पावा...

शांताबाई : श्रीरामऽऽऽ

राजा : ढाकण्यांची आणखी एक आयडिया...

शांताबाई : ती काय ?

राजा : स्मारकाची एकेक वीट एकेका मायवर साहित्यिकाच्या हस्ते रचायची. ( सोनाली येते. कान देऊन ऐकू लागते ) सर्व साहित्यिकाना निमंत्रणं गेलीत. जाण्यायेण्याचं भाडं आणि मानधनाचे चेक निमंत्रणासोबतच पाठवलेत. एक साहित्य संमेलाच होणार असं दिसतंय.

सोनाली : (शांताबाईंना) एवढा पैसा कुठनं आणलाय विचारलं नाहीत...

शांताबाई : राजकारण्यांना पैशाचा काय तोटा ?

सोनाली : अगदी बरोबर... 'मुख्यमंत्री निधी'तून पाच लाख मिळालेत. वेगवेगळ्या प्रतिष्ठानांनी लाखोंनी मदत केलीय. मोठमोठ्या संस्थांकडून स्मरणिकेसाठी जाहिराती, लोकांकडून वर्गणी, आणि शिवाय वेगवेगळ्या कामांसाठी चार-पाच उद्योगपतींना प्रायोजक म्हणून हाताशी धरलंय. पैशाचा पूर वाहतोय नुस्ता.

राजा : त्यात काय गैर आहे?

सोनाली : (टोमणा मारत) इतिहासाची पुनरावृत्ती अटळ आहे !

राजा : कसली पुनरावृत्ती?

सोनाली : मागे 'रंगविहारी कृतज्ञता निधी' च्या नावाखाली गोळा केलेल्या दोन लाख रुपयांची जशी भानगड झाली तशीच होणार आता... (शांताबाईंना) मढ्याच्या टाळूवरचं लोणी खाणारे लोक आहेत हे.

राजा : अशातला काही प्रकार नाही. हिच्या आडमुठेपणामुळं कोर्टानं गोठवून ठेवलंय ते खातं. हिनं सही केली असती तर एव्हाना रंगविहारींच्या नावानं एक अध्यासन सुरू झालं असतं विद्यापीठात.

सोनाली : आता करा की !

राजा : बघू, त्यासाठी तुझ्या सल्ल्याची गरज नाही.

सोनाली : पण त्यासाठी पैसे तर हवेत ना ?

राजा : मिळतील आता या समारंभातनं.

सोनाली : कसले मिळतायेत, उलट दीडदोन लाखाचं कर्ज झालंय असं दाखवायला कमी करणार नाही तो ढाकणे मी चांगलं ओळखते ह्या राजकारण्यांना !

शांताबाई : अगं जाऊ दे ना.

सोनाली : काय चुकीचं बोलतेय मी ? मला सांगा शांताबाई, रंगविहारींच्या जन्मशताब्दीशी भाजीवाल्यांचा काय संबंध? किराणा सामान विकणारांचा, हॉटेलवाल्यांचा काय संबंध ? दारूच्या दुकानदारांनासुद्धा सोडलं नाही या लोकांनी वर्गणीतून. बाकी ते योग्यच होतं म्हणा. ( हसते. तिच्या हसण्याला शांताबाई अनुकूल.)

राजा : कोणतीही गोष्ट मीठमसाला लावून सांगायची सवयच असते तुम्हा पत्रकारांना.

शांताबाई : तू कशाला डोक्यात राख घालून घेतोयस ?

सोनाली : आपलं मानधन याच पैश्यातून मिळालंय या वस्तुस्थितीमुळं गिल्टी वाटतंय त्यांना!

राजा : (चिडत ) माझं वकीलपत्र दिलंय का मी तुला ?

शांताबाई : कशाला भांडताय रे बाबांनो ?

राजा : माझ्याशी बोलायला तुला वेळ कुठाय ?

शांताबाई : बोलत नाही तर काय करतेय ? तू विचारतोहेस त्या सर्व प्रश्नांची उत्तरं देतेय ना मी ?

राजा : ती सगळी मला गोंधळात टाकणारी.

शांताबाई : म्हणजे ?

राजा : काकांच्या कवितेविषयी आणि आयुष्याविषयी अधिकृतपणे माहिती देणारा तूच एकमेव दुवा शिल्लक आहे आता. पण तूच जर असं वागायला लागलीस तर त्यांच्यासंबंधी निर्माण झालेले अनेक प्रश्न तसेच अनुत्तरित राहतील, हे लक्षात येत नाही तुझ्या.

सोनाली : पीएच्.डी. करतांना हे तुमच्या लक्षात यायला हवं होतं.

राजा : म्हणजे?

सोनाली : तेव्हा एका शब्दानं तरी विचारलंत का तुम्ही तेव्हा शांताबाईंना ? उलट 'त्यांना समजून घेण्यासाठी त्यांच्या कवितेची फार मोठी मदत झाली' असं लिहिलंत प्रस्तावनेत.

राजा : (चिडून) हो, लिहिलं. पण त्यांच्या साहित्याविषयक जाणिवा आणि त्यांचं व्यक्तिगत आयुष्य यातील सुसंगती शोधणं हा नवा विषय आहे माझ्या अभ्यासाचा.

सोनाली : मग त्यासाठी त्यांचं चरित्र पुहा एकदा नव्यानं लिहावं लागेल तुम्हाला. रंगविहारी हा एक माणूसच होता, देव नव्हता... त्यांच्या मृत्यूचं गूढ म्हणजे तर तुमच्या सारख्या सो कॉल्ड विचारवंतांना आपल्या अकलेचे तारे तोडण्यासाठी मिळालेल लायसन्सच ठरलंय जणू... (उद्रेकानं) काय लिहून ठेवलंय तुम्ही त्यांच्या मृत्युविषयी ?

शांताबाई : कशाला वाद घालत बसलाय रे बाबांनो ?

राजा : (तावातावाने) बरं झालं तूच आहेस इथं. तूच सांग आता की, रंगविहारीं गेले त्या दिवशी मन:स्थिती कशी होती त्यांची ? दिवसभर ते काय करीत होते ? घरातलं वातावरण कसं होतं ?

शांताबाई : अरे बाबा, हे सर्व लिहिलंयस की तू त्यांच्या चरित्रात.

राजा : पण त्यातील तपशिलाविषयी टीकाकारांनी काहीही आक्षेप घेतले नाहीत.

सोनाली : यावरून टीकाकारांची बौद्धिक पात्रता कोणती हे तुम्ही तेव्हाच ओळखायला हवं होतं. (शांताबाई खुदुखुदु हसतात. जणू काही त्यांना ते मान्यच आहे.)

राजा : (शांताबाईंना) मी जे काही लिहिलं त्यापेक्षा वेगळंच काहीतरी घडलं होतं असं म्हणायचं का तुला ?

शांताबाई : तू स्वतःचीच मतं खोडून काढतोयस.

राजा : (आक्रमकपणे) काही गोष्टी जगासमोर येऊ नयेत याची मुद्दामच काळजी घेतली होती मी.

शांताबाई : काय ते स्पष्ट बोल ना!

राजा : त्याचं कारण ‘तू’ होतीस !

शांताबाई : मी ?

राजा : हो, तुझ्या भल्यासाठीच रंगविहारींच्या चरित्रातील काही तपशील मोकळे सोडून दिले मी !

सोनाली : (उपरोधाने) ऐका शांताबाई ! तुमच्या भल्यासाठी काही तपशील मोकळे सोडून दिले यांनी चरित्र लिहिताना. व्वाः ! ( राजाला ) एवढे उपकार कशासाठी केलेत तुम्ही यांच्यावर ? आरोप करायचे तर स्पष्टपणे करा की!

राजा : तुला वकीलपत्र दिलंय का काकूनं ?

सोनाली : त्यांनी वकीलपत्र देण्याची गरज नाही. रंगविहारी ही काय कुणाची खाजगी मालमत्ता नाही. वस्तुस्थिती लोकांसमोर आलीच पाहिजे.

राजा : (निकराने ) १३ डिसेंबर १९२० या दिवशी रंगविहारी गेले, ही खरी गोष्ट आहे ना ?

सोनाली : सगळ्या जगाला माहिताय ते, त्यात नवीन काय ?

राजा : तेच शोधायचंय.

सोनाली : म्हणजे काय ?

राजा : जे सांगितलं गेलं नाही ते !

सोनाली : म्हणजे नव्या वादाला तोंड फोडायचंच तुम्हाला... वर्षभर मजेत स्तंभलेखन करू शकाल त्यावर. भरपूर पैसे मिळतील. नंतर पुस्तकसुद्धा निघेल. कवीचे चाहते हातोहात विकत घेतील ते... चांगली 'स्ट्रेटेजी' आहे!  ( काय ढोंगी माणूस आहे हा ह्या अर्थी मोठ्यानं हसते.)

राजा : (चिडून) तुला वाटतं तसा मी काकांच्या आयुष्याचा बाजार मांडलेला नाही.

शांताबाई : हे ऐकून त्यांच्या आत्म्याला शांती मिळेल !

राजा : चला म्हणजे ते आयुष्यभर अशांत होते हे तरी तू माय केलंस !

सोनाली : प्राध्यापकीबरोबर तुम्ही वकिली सुरू केलीत तरीसुद्धा चालेल ती !

शांताबाई :  ( हस्तक्षेप करीत ) मला बोलून द्याल का तुम्ही ?

राजा : तू बोलत नाहीस म्हणून तर चाललाय हा सगळा गोंधळ!

शांताबाई :  विचार काय ते!

राजा : ( थांबून ) रंगविहारी विषमज्वरानं गेले ?

शांताबाई : बरोबर, जन्ममृत्यू नोंदवहीत नोंद आहे तशी.

राजा : मोठ्या काकांनी ती मुद्दाम तशी करून घेतलीय.

शांताबाई : असं कशाला करतील ते ?

राजा : आनंदराव बर्व्यांची 'भंगलेला अरुण' ही कविता माहिताय तुला?

शांताबाई : तोंडपाठ आहे.

राजा : त्या कवितेखाली त्यांनी १३ डिसेंबर १९२० ही तारीख टाकलीय. म्हणजे ज्या दिवशी रंगविहारींचं निधन झालं त्या दिवशी त्यांनी ती लिहिली.

शांताबाई : बरं, पुढं बोल...

राजा : रंगविहारी आजारी होते तेव्हा त्यांना भेटायला बर्वे नेहमी इथं यायचे हे खरं आहे ?

शांताबाई : कधीकधी बर्वे यायचे हे खरं आहे पण अनेकदा कवीच रात्रीच्या वेळी बर्व्यांकडे जाऊन बसायचा.

राजा : दोघांची अतूट मैत्री होती त्यामुळं अर्थातच रंगविहारीच्या अकस्मात मृत्यूची बातमी ऐकून बर्व्यांना धक्का बसला...

सोनाली : (त्याचं वाक्य उचलत) आणि त्यांनी 'भंगलेला अरुण' ही कविता लिहिली...

राजा : प्लीज गप्प बसशील का तू ?

सोनाली : असली संधी सोडली तर तो कवी कसला ?

राजा : ( तिच्याकडे दुर्लक्ष करत.. शांताबाईंना ) ही कविता तोंडपाठ करावी असं का वाटलं तुला ?

शांताबाई : मी ती केली नाही, झाली.

राजा : झाली ?

शांताबाई : कारण बर्व्यांनी शेवटच्या कडव्यात एक मोठी चूक केली होती.

राजा : कोणती चूक ?

शांताबाई : यमक जुळवण्यासाठी त्यानी 'अरुण'चा 'आरुण' केला होता.

राजा : म्हणून दाखवतेस ते कडवं ?

शांताबाई : "लाटांची थरथर असली

निःशब्द मुकी दारुण

कवळाटून हृदयापाशी

भंगला येथ आरुण..."

राजा : अर्थ सांगशील या ओळींचा?

शांताबाई : मावळणाऱ्या सूर्याचं प्रतिबिंब पाण्याच्या तळाशी पडलंय. त्यामुळं त्यानं सूर्य आपल्या छातीशी कवटाळल्याचा असा भास होतो. पाण्यावर सतत उमटणाऱ्या तरंगांमुळं ते प्रतिबिंब खंडित होताना दिसतं आणि त्यामुळं कवीनं त्यासाठी 'भंगणे' हा शब्दप्रयोग केलाय.

राजा : फार हुषार आहेस तू, काकू.

सोनाली : तुम्हाला शंका का यावी ?

राजा : चुकीचा अर्थ खरा वाटावा इतक्या चतुरपणे सांगतेय ती !

शांताबाई : म्हणजे नक्की काय म्हणायचंय तुला ?

राजा : अकरा डिसेंबरच्या रात्री म्हणजे मृत्यूच्या दोन दिवस आधी रंगविहारींनी 'आल्हाददायक झुळूक' नावाची एक कविता लिहिली होती. वाळवंटातून प्रवास करणाऱ्या एका प्रवाशाला वाटेत अचानक एक पुष्करणी दिसते. तिथे थांबून विसावा घेतल्यानंतर त्या क्षणी तिथेच आपला प्रवास संपावा अशी इच्छा तो कवितेतून प्रदर्शित करतो.

शांताबाई : बरं मग ?

राजा : ही कविता त्यांनी आपल्या घरी बसून लिहिली असं बर्व्यांनी त्यांच्या आत्मचरित्रात म्हटलंय.

शांताबाई : बरोबर आहे.

राजा : बर्व्यांचं घर येथून किती लांब आहे ?

शांताबाई : असेल मैलभर...

राजा : मग विषमज्वरानं अंथरुणाला खिळलेला माणूस मृत्यूच्या दोन दिवस आधी आपल्या पायानी मैलभर चालत जाऊन परत येऊ शकेल ?

शांताबाई : तुला काय म्हणायचंय, स्पष्टपणे का बोलत नाहीस ?

राजा : ऐकण्याची हिम्मत आहे तुझी ?

( ढगांचा गडगडाट होतो.)

शांताबाई : (आकाशाकडे पाहात) श्रीऽऽ राऽऽमऽऽ

राजा : सत्य दडपण्यासाठी श्रीरामाची काहीही मदत व्हायची नाही.

शांताबाई : सत्य दडपण्यासाठी ? कसलं सत्य ? काय चाललंय तुझं आल्यापासून?

राजा : (प्राध्यापकी थाटात) रंगविहारींना कवितेची विलक्षण नशा असायची. त्या कैफात ते जगाचं भान विसरून जायचे. अशा वेळचं त्यांचं वागणं लोकांना चमत्कारिक वाटायचं, वेडेपणाचं वाटायचं. प्रतिभेचं बोट धरून ते जेव्हा काव्याच्या अलौकिक विश्वामध्ये मुक्तपणे संचार करीत तेव्हा इतर माणसं व्यवहाराच्या गटारगंगेत कीटकांसारखी वळवळत असत. तूही त्या इतरांपैकीच एक होतीस. जिथं जिथं संधी मिळेल तिथं तिथं तू त्यांचा तेजोभंग करण्याचा प्रयत करायचीस. महाराष्ट्राच्या त्या लाडक्या पाखराचं संपूर्ण भावविश्व तू उद्ध्वस्त करून टाकलं होतंस. त्यातूनच त्यांचं मानसिक स्वास्थ्य हळूहळू बिघडत चाललं. तेरा डिसेंबरला रात्री जेव्हा ते घरी आले तेव्हा त्यांना पाय धुण्यासाठी गरम पाणी हवं होतं, पण तुला झोप महत्त्वाची वाटल्यानं तू त्यांच्याशी भांडण उकरून काढलंस. आल्या पावली, उपाशी पोटानं ते बाहेर पडले... मित्राकडं मन मोकळं करावं म्हणून ते बर्व्यांकडे नेले. बर्वे घरी - नसल्यानं त्यांच्या मनाची अधिकच उलघाल झाली. जणू काही तू ओरबाडून काढलेल्या त्यांच्या आयुष्यामधून जीवनरस पूर्णपणे वाहून गेला होता... वाळवंटातून प्रवास करणाऱ्या प्रवाशाला जशी पाण्याची स्वपं पडावीत तशीच त्यांची भावावस्था झाली होती. तशाच विमास्क स्थितीमध्ये वाट दिसेल तिकडे फिरत पहाटे पहाटे ते घरी आले. तुझी झोपमोड झाल्यामुळे पुन्हा तू त्यांचा पाणउतारा केलास. तो घाव वर्मी बसला. त्याच तिरमिरीत ते धावत आडापाशी गेले आणि त्यांनी आत उडी मारली. त्यांचं फुगून वर आलेलं प्रेत पाहून बर्व्यांनी लिहिलं -

'लाटांची थरथर असली

निःशब्द मुकी दारुण

कवटाळून हृदयापाशी

भंगला येथ आरुण... "

तू मारलंस त्यांना काकू, तू मारलंस. एका निष्पाप प्रज्ञावंताचा जीव घेतलास. मराठी सारस्वताचं कधीही भरून येणार नाही असं नुकसान केलंस... आपल्या घराण्याची अब्रू वेशीवर टांगली जाऊ नये म्हणून आजवर कुठं बोललो नव्हतो मी हे. आणि दुसरं म्हणजे तुझी काळजी होती. लोकांना जर हे समजलं असतं तर त्यांनी तुला दगडानी ठेचून मारली असती... (शांतता. शांताबाई अस्वस्थ. 'श्री राऽऽऽम ऽऽऽ, श्री राम' करत राहतात.)

सोनाली : (त्यांच्या जवळ जाऊन त्यांच्या पाठीवर हात ठेवत) शांत व्हा शांताबाई... प्लीज्...

शांताबाई : तसंही तोंड बंदच ठेवते मी नेहमी.

सोनाली : काय तोंडाला येईल ते बडबडतायत ते. त्यांना वाटतंय की वर्गातल्या पोरांसमोरच बोलतोय आपण.

राजा : तू शिकव मला आता कसं बोलायचं ते.

सोनाली : (त्याच्याकडे दुर्लक्ष करत शांताबाईंना) पण तरीही नेमकं काय झालं होतं, हे जगाला समजलंच पाहिजे... आणि त्यासाठी तुम्ही बोललं पाहिजे शांताबाई.

शांताबाई : तेच सांगतेय, बोलण्यासारखं काय राहिलंय?  नशिबाचे भोग म्हणायचे आणि गप्प बसायचं.

सोनाली : उगाच नशिबाला बोल लावू नका. काय झालंय ते स्पष्टपणे सांगा शांताबाई. बोला. प्लीज...

शांताबाई : नको तो चिखल उपसायला लावू पोरी.

सोनाली : रंगविहारी विषमज्वरानं गेले हे माहिताय सर्व जगाला..

शांताबाई : चूक आहे ते.

सोनाली : म्हणजे ? मग हे म्हणतायत ते खरं समजायचं का ?

शांताबाई : त्याचंही चूक आहे.

सोनाली : म्हणजे ?

शांताबाई : रंगविहारीला विषमज्वर नव्हे तर दुसराच आजार होता.

राजा : कोणता ?

सोनाली : कोणता आजार ? सांगा ना ?

शांताबाई : एक संशोधक आणि एक पत्रकार एकत्र असल्यावर मला म्हातारीला कशाला उगाच बोलायला भाग पाडताय रे ?

राजा : एक महान कवी आणि स्वतःच्या नवऱ्याविषयी संभ्रम निर्माण करणारं वक्तव्य करणं तुला शोभत नाही काकू...

सोनाली : ( राजाला ) तुम्ही त्यांच्यावर दडपण आणू नका. 'सत्य हे लोकांच्या समोर येणं आवश्यक असतं मग ते कितीही कटू असो' असं म्हणता ना तुम्ही ?

राजा :  पण त्याला काही पुरावा नको ?

शांताबाई : कसला पुरावा ? आणि मला काय गरज आहे एखादी गोष्ट सिद्ध करण्याची ? काय मिळवायंच मला ? आता तू आणला होतास त्या पेपरातला तो फोटो...

राजा : त्याचं काय?

शांताबाई : तिथं दारू पीत बसायचा कवी !

राजा : (उसळत) इम्पॉसिबल !

शांताबाई : जास्त झाली की तिथंच उलट्या करायचा. माझ्या हातानं साफ करायची मी ते सर्व. (संगीत)

राजा : म्हातारपणामुळं बुद्धी भ्रष्ट झालीय तुझी !

सोनाली : ( साक्षात्कार झाल्याप्रमाणे) येस... येस... आता हळूहळू लक्षात येत चाललंय माझ्या....

राजा : काय लक्षात येत चाललंय ?

सोनाली : रेव्हरंड फडक्यांच्या डायरीतला एक संदर्भ प्रकाश टाकतोय ह्या साऱ्याच प्रकरणावर.

राजा : कसला संदर्भ ? कसलं प्रकरण ?

सोनाली : फार पूर्वी कुणीतरी एका मिशाऱ्याने गावाबाहेर कुष्ठरोग्यांसाठी एक दवाखाना बांधून ठेवला होता. तो बंद झाल्यावर अनेक वर्ष तसाच पडून होता... त्या पडीक दवाखान्यात कवीनं राजम्मा नावाची एक बाई आणून ठेवली होती... (शांताबाईंना) होती की नव्हती ? बोला शांताबाई बोला ! आता गप्प बसण्याची वेळ नाही. त्या पडीक दवाखान्यात रंगविहारींनी बाई आणून ठेवली होती की नाही?

शांताबाई : बाई होती...राजम्मा नावाची... पण तिला कोणी आणून ठेवलं हे मला माहीत नव्हतं.

राजा : उगाच फशी पडू नकोस हिच्या बोलण्याला. तिला कोणी आणून ठेवलं हे माहीत नव्हतं तर मग तिचं नाव तुला कसं माहीत ?

शांताबाई : (त्याच्याकडे दुर्लक्ष करीत) राजम्मा दिसायला अतिशय सुंदर होती.

राजा : तू तिला बघायला गेली होतीस ?

शांताबाई : नाही.

राजा : मग ती सुंदर होती हे तुला कसं माहीत ?

शांताबाई : कारण तीच मला भेटायला इथं आली होती.

राजा : मला वेड लागण्याची पाळी आलीय.

शांताबाई : श्री राऽऽऽम...

राजा : (निग्रहानं संभाषण रेटत ) काकांनी राजम्मा नावाची ... (पुढचे शब्द तो उच्चारू शकत नाही.)

सोनाली : (ठामपणे) बाई ठेवली होती !

राजा : शीः शीः त्या निष्पाप कलावंतावर असे बेछूट आरोप करताना जीभ झडून का पडली नाही तुझी ?

सोनाली : तिच्यापासून त्यांना 'तो' रोगही झाला होता. फडक्यांच्या डायरीत उल्लेख आहे तसा.

राजा : (चिडून) कोणता रोग ?

सोनाली : तोच. जो होऊ नये तो. बाहेरख्यालीपणामुळे होणारा.

राजा : डोकं फिरलंय तुझंही. कदाचित तुलाच असला एखादा रोग झाला असेल आणि म्हणून सोडलं असेल नवऱ्यानं तुला... (शांताबाईंना..) आणि तू गप्प का थेरडे ? आता का तोंड धरलं तुझं ? ( शांताबाई गप्पच. मग राजा सोनालीकडे वळतो.) कोणत्या आधारे म्हणतेस तू हे ? त्या पिढीतलं आता दुसरं कोणीही जिवंत नाही, दुसरा कोणताही पुरावा आता मिळू शकणार नाही, हे ओळखून हिला हाताशी धरून एक सनसनाटी बातमी तयार

करण्याचा खटाटोप चालला तुझा... आपल्या पेपरचा खप वाढवण्यासाठी... रविवार-पुरवणीची सूत्र हाती घेण्यासाठी! (शांताबाईंना) काय आधार आहे हिच्या ह्या घाणेरड्या आरोपांना ?

शांताबाई : रात्र झाली की रोज कवी बाहेर जायचा तिथंच त्याचं खाणं-पिणं सर्वकाही व्हायचं. ('पिणं' ह्या शब्दावर जोर देत. )

राजा : खाणं-पिणं ?

शांताबाई : हो, रात्री त्याचं खाणं पिणं बाहेरच व्हायचं.

राजा : पण ते तिथं का जायचे ? तिथं जे सुख त्यांना मिळायचं असं तुला वाटतं ते तू त्यांना इथं देत नव्हतीस का ?

शांताबाई : हाच प्रश्न मला एका पत्रकारांनं विचारला होता.

राजा : मग काय उत्तर दिलंस ?

शांताबाई : वहाणेनं थोबाड फोडलं त्याचं... अरे, काय चाललंय काय तुमचं हे ? मरायचा तो मरून गेला आणिमाझ्या अब्रूचे धिंडवडे का काढताय तुम्ही?

सोनाली : (शांताबाईंची समजूत घालत) शांताबाई, तुम्हाला त्रास होतोय हे खरं आहे पण सत्य लोकांसमोर यायला नको का ?

शांताबाई : कसलं सत्य घेऊन बसलीस ? अगं... शरीर म्हणजे काय तेसुद्धा कळत नव्हतं मला... आंघोळ करून आले तर कानात साबण तसाच असायचा, केस विंचरता यायचे नाहीत... त्यात तो दारू पिऊन यायचा... विड्या ओढायचा... मला बघितलं की... (अस्वस्थ, मूक होतात. त्यांना आपल्या भावना व्यक्तच करता येत नाहीत. तोवर सोनाली जणू पूर्वीची शांता झालेली असते. शांताबाईंचे संवाद ती स्वतःच म्हणू लागते.)

सोनाली : (जणू शांताबाई)... मला बघितलं की, त्याच्यातलं जनावर जागं व्हायचं. माझ्या भावनांचा चोळामोळा करून तो जेव्हा माझ्या शरीराशी खेळ करायचा तेव्हा मला किळस यायची त्याची. माझ्याकडं जे नव्हतं त्याची मागणी करायचा... तशातच त्याचा बाहेरख्यालीपणा वाढत गेला... तो घाणेरडा रोग जडला... मी अनेकदा सांगायची पण तो ऐकायचा नाही. तेरा डिसेंबरला त्याचा मृत्यू झाला, तो दिवस जसाच्या तसा आठवतोय मला. कवी नोकरी करत नाही, घरी बसून खातो म्हणून सकाळीच घरात भांडण झालं होतं. त्याच दिवशी गावात सैन्य भरतीसाठी मिलिट्रिचे लोक आले होते. त्यातले काहीजण रात्री राजम्माकडं गेले. तिथं तिच्यावरून कवीची आणि त्यांची बाचाबाची झाली. त्यांनी राजम्मासमोरच त्याला मारहाण केली आणि बाहेर फेकून दिला. सकाळचा अपमान आणि त्यात हा मार त्याला सहन झाला नाही. पहाटे तीन साडेतीनच्या सुमारास आडात काहीतरी पडल्याचा आवाज मला ऐकू आला. पण त्याचं गांभीर्य लक्षात न आल्यामुळं मी तिकडं दुर्लक्ष केलं. सकाळी उठून पाणी भरायला गेले तर आडात त्याचं प्रेत ... लगबगीनं मी मोठ्या भावजींना बोलावलं. त्यांनी कपाळावर हात मारून घेतला आणि म्हणाले 'कुठं बोलू नकोस' तेव्हापासनं तोंडाला कुलूप घातलं ते आजपर्यंत ! (पुहा सोनाली होत... ) तोंडाचं कुलूप उघडा शांताबाई... बोला, सांगा काय झालं ते ! बोला शांताबाई...

(राजा कमालीचा अस्वस्थ )

शांताबाई : ... कवी गेल्यानंतर दहा-पंधरा दिवसानी एका संध्याकाळी अचानक दारात एक बाई येऊन उभी राहिली. देखणी बाई. ती कोण, कुठनं आली, कुठं गेली, मला काहीच माहीत नव्हतं. तिथं काय घडलं हे तिनंच मला सांगितलं. जाताना नमस्कार करून म्हणाली, "बेटी, आज से मे ये गाव छोड के जा रही हूं. तुम्हारे आदमी का एक कागज मेरे पास पडा था, वो देने के लिए आई थी मै..." असं म्हणून कागदाचा एक तुकडा माझ्यासमोर टाकून ती निघून गेली.

राजा : कसला कागद ? काय होतं त्या कागदावर ?

शांताबाई : कविता.

राजा : कविता ? कोणती कविता ?

शांताबाई : 'आल्हाददायक झुळूक'

सोनाली : 'आल्हाददायक झुळूक? ओह माय गॉड! आता आलं लक्षात की, त्या कवितेतील 'वाळवंटातील यात्रिक' कोण आणि 'पुष्करणी' कोणती ती ! ओ गॉड! ओ माय गॉड !

( कविता म्हणू लागते.)

आल्हाददायी झुळूक यावी

पांथस्थाच्या ओठावरती

पुष्करणीचे गाणे व्हावी...

पुष्करणीचे गाणे व्हावे

आकाशीचा झुला,

फुलाफुलातील गंध अनामिक

होऊन ध्यावे तुला !

वाः वाः वाः ! (राजाला) मराठीत गाजलेली, साहित्यातील अमौलिक लेणं ठरलेली कविता. वाः बहोत खूब !

राजा : पण बर्व्यांनी आपल्या आत्मचरित्रात लिहिलंय की ती कविता रंगविहारींनी त्यांच्या घरात बसून लिहिली. मला नक्की आठवतंय... कवितेखाली  अकरा डिसेंबर ही तारीख होती मग त्यांनी मृत्यूपूर्वी दोन दिवस आधी लिहिलेली कविता राजम्माकडं जाईलच कशी ?

सोनाली : सगळ्याच कठीण प्रश्नांची उत्तरं आता अगदी सोपी होऊन समोर यायला लागलीत.

राजा : म्हणजे ? काय म्हणायचंय काय तुला ?

सोनाली : चरित्राप्रमाणेच आत्मचरित्रही खोटं लिहिता येतं.

राजा : म्हणजे बर्व्यांचं आत्मचरित्रसुद्धा–

शांताबाई : ( वाक्य उचलत) खोटं आहे !

राजा : सगळं जग खोटं. तूच तेवढी खरी !

शांताबाई : (त्या संदर्भात हरवत) रेव्हरंड फडक्यांची एकही कविता 'काव्य सरित्सागर' मध्ये छापायच्या लायकीची नाही असं म्हणून आयुष्यभर बर्वे त्यांचा दुस्वास करीत राहिले पण 'मधुकर' ह्या टोपण नावानं आपणच नियमितपणे छापलेल्या कविता फडक्यांच्या होत्या हे मात्र त्यांना कधीच कळलं नाही.

सोनाली : ओ माय गॉड!

शांताबाई : कवीनं त्या कवितेखाली 'तेरा डिसेंबर मध्यरात्र' असं लिहून स्वाक्षरी केली होती. राजम्मानं दिलेला तो कागद अजून जपून ठेवलाय मी.

राजा : म्हणजे रंगविहारी त्या रात्री बर्व्यांकडे गेले नव्हते असं म्हणायचंय का तुला?

शांताबाई : त्या रात्रीच काय पण कोणत्याही रात्री तो तिकडे जात नव्हता.

राजा : मग कुठं जात होते ?

शांताबाई : मघाशीच सांगितलं ना बर्व्यांच्या निमित्तानं तो रोज बाहेर जात होता.

राजा : पण बर्व्यांनी त्यांना असं संरक्षण देण्याचं कारण काय ?

सोनाली : दोघांनी मिळून शोधून काढलेली पळवाट होती ती.

राजा : दोघांनी मिळून ? म्हणजे ? लक्षात नाही आलं.

शांताबाई : सोपं आहे अगदी.

राजा : काय ?

शांताबाई : बर्वेसुद्धा राजम्माकडं जात होते.

सोनाली : मराठी सारस्वतातील हे दोघेही 'निष्पाप प्रज्ञावंत' मिळून बरोबरच राजम्माकडं जात होते. वा: क्या बात है ! क्या बात है ! उद्याच्या अंकात वाचा!  (मोठ्याने हसते.)

शांताबाई श्री राऽऽऽम, श्री राऽऽऽम करीत आहेत. राजा कोलमडलेला. अंधार होऊ लागतो. दूरवर वीज कोसळते. तिचा लखलखाट. ढगांचा गडगडाट. सोसाट्याचं वारं सुटतं. पाचोळा घरात येऊ लागतो. हळूहळू पडदा.

**मध्यंतर.**

***

सूचना :

ज्यांना या नाटकाची पूर्ण संहिता हवी असेल त्यांनी वेबसाईटवर दिलेल्या पत्त्यावर लेखकाशी संपर्क साधावा.

हे नाटक पूर्णपणे काल्पनिक असून त्यातील एखादी व्यक्ती व प्रसंग ह्यांचे प्रत्यक्ष जीवनात कोठे साधर्म्य आढळून आल्यास तो केवळ योगायोग समजावा. सर्व हक्क लेखकाकडे राखीव आहेत. प्रयोग करण्यापूर्वी लेखकाची लेखी परवानगी घेतली जावी. नाटकाचे भाषांतर, रूपांतर, त्यावर आधारित चित्रपट, चित्रमालिका, अभिवाचन, यूट्युब-फेसबुकवरील किंवा अशा अन्य माध्यमातून पूर्ण, अंशतः किंवा तत्सम कोणत्याही प्रकारच्या चित्रिकरण, ध्वनिमुद्रण, प्रसारण, अविष्कारापूर्वी लेखकाची परवानगी घेणे बंधनकारक आहे.

***